जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-28

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वरुड | गुरुवार

१६.०४.२०२६

वर्ष: ०७ | अंक: ७५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

## थोडक्यात

### तापमानाचा भडका, अकोल्यात सलग दुसऱ्या दिवशी पार ४४ अंशांवर

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**अकोला** – अकोल्यात दोन दिवसांपासून तापमानाचा पारा ४४ अंशापार आहे. काल (१५ एप्रिल) ४४.२ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची अकोल्यात नोंद झालीय. या वाढत्या तापमानामुळे अकोल्यातील महावितरणाच्या सर्वच विद्युत उपकेंद्रातील ट्रान्सफॉर्मर थंड ठेवण्यासाठी चक्क कुलर्सचा आधार घ्यावा लागतोये. आज जगात उष्ण शहर म्हणून अकोल्याच नाव नोंद झालंय. ४४ अंशावर तापमानाचा पारा गेल्याने सर्वच विद्युत उपकेंद्रात ट्रान्सफॉर्मरचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी, आणि ट्रांसफार्मर'मधील ऑइल गरम होऊ नये, म्हणून कुलरची व्यवस्था करण्यात आली आहे.

## फ्रान्स हा भारताच्या सर्वात विश्वासु आणि मैत्रीपुर्ण भागीदारांपैकी एक : लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – फ्रान्स हा भारताचा सर्वात विश्वासार्ह आणि मैत्रीपूर्ण भागीदारांपैकी एक आहे असे सांगत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी दोन्ही देशांमधील खोलवर रुजलेले आणि दीर्घकालीन संबंध अधोरेखित केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यातील जिव्हाळ्याच्या वैयक्तिक संबंधांमुळे द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत आणि दृढ होण्यास मोठी गती मिळाली आहे, असे त्यांनी नमूद केले. फ्रान्सच्या सिनेटच्या भारत–फ्रान्स आंतर–संसदीय मैत्री गटाच्या शिष्टमंडळाने संसद भवनात बिर्ला यांची भेट घेतली, त्यावेळी त्यांनी हे विचार व्यक्त केले.

फ्रान्सच्या संसदेत महिलांचे प्रतिनिधित्व ३६ टक्क्यांहून अधिक असल्याबद्दल प्रशंसा करताना बिर्ला यांनी, भारत देखील प्रशासनातील महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी सातत्यपूर्ण वैधानिक आणि संस्थात्मक प्रयत्न करत आहे यावर भर दिला.

तळाच्या स्तरापर्यंत, विशेषतः पंचायती राज संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व अत्यंत उत्साहवर्धक असल्याचे त्यांनी समाधानाने नमूद केले.

बिर्ला यांनी शिष्टमंडळाला पुढे माहिती दिली की, नव्याने बांधलेल्या संसद भवनात संमत करण्यात आलेले पहिले विधेयक 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हे होते, जे निवडून आलेल्या वैधानिक संस्थांमध्ये महिलांसाठी एक–तृतीयांश आरक्षणाची तरतूद करत आहे. हा ऐतिहासिक कायदा महिला–प्रणीत विकास आणि सर्वसमावेशक प्रशासनाप्रति भारताची ठाम वचनबद्धता दर्शवतो, असे त्यांनी अधोरेखित केले.

भारत आणि फ्रान्स यांच्यातील राजनैतिक आणि संसदीय अशा दोन्ही स्तरांवरील नियमित आणि विधायक संवादाबद्दल बिर्ला यांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी गेल्या वर्षी 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारतीय संसदीय शिष्टमंडळाच्या फ्रान्स भेटीची आठवण करून दिली आणि त्या काळात फ्रान्सने दहशतवादाच्या स्पष्ट शब्दांत केलेल्या निषेधाची प्रशंसा केली. त्यांनी फ्रेंच शिष्टमंडळाच्या सदस्यांचा सातत्यपूर्ण पाठिंबा आणि एकजुटीच्या भावनेबद्दल त्यांचे आभार मानले.

## कैसा हराया...सहर शेखचं नगरसेवकपद धोक्यात

### येताच नॉट रिचेबल : वडीलही गायब, फोनही घेईनात

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**ठाणे** – महानगर पालिकेच्या निवडणुकीत मुंब्रा परिसरातील चर्चेत आलेला प्रभाग क्रमांक ३० या प्रभागातून एमआयएमच्या उमेदवार सहर शेख यांनी विजय मिळवत राजकारणात जोरदार एन्ट्री केली.



पालिकेच्या निवडणुकीनंतर सहर शेख यांच्या कैसा हराया...या डायलॉगची ठाणे, मुंबईसह राज्यभरात मोठी चर्चा रंगलेली होती. आता याच सहर शेखकडून शासकीय यंत्रणांची दिशाभूल झाल्याचं समोर आलं आहे. त्यानंतर आता पुन्हा एकदा नगरसेवक सहर शेख चर्चेत आल्या आहेत.

त्यांनी शासकीय यंत्रणांची दिशाभूल झाल्याचं समोर आल्यानंतर आता सहर शेख नॉट रिचेबल असल्याची माहिती समोर आली आहे. सहर शेख आणि वडील युनूस शेख नॉट रिचेबल वडीलांच्या जात प्रमाणपत्र वैधता प्रकरणावरुन सहर शेख यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. सहर शेख आणि वडील युनूस शेख नॉट रिचेबल झाले असल्याचं समोर आलं आहे. सहर शेख मुंब्रा प्रभाग क्रमांक ३० मधून चखच पक्षाच्या नगरसेविका आहेत.

मात्र सहर शेख आणि त्यांचे वडील गेल्या काही दिवसांपासून मुंब्र्यात देखील नसल्याची माहिती आहे. जात प्रमाणपत्र वैधता प्रकरणी शेख परिवाराकडून कमालीची गुप्तता पाळली जात आहे. सिद्दीकी फराह शबाब अहमद या तरुणीने सहर शेख यांच्याबाबत तक्रार केली होती. तक्रार करणारी सिद्दीकी फराह शबाब अहमद ही तरूणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची उमेदवार होती. प्रभाग क्रमांक ३० मधूनच ती देखील उमेदवार होती.

माध्यम प्रतिनिधींचे फोन घेणे टाळले सहर शेख यांचे वडील युनूस खान यांचे जात प्रमाणपत्र खोटे असल्याची तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीवर जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीची अहवाल लवकरच येणार आहे. यामुळे सहर शेख आणि त्यांचे वडील युनूस खान नॉट रिचेबल आहेत अशी माहिती समोर आली आहे. त्याचबरोबर त्यांनी माध्यम प्रतिनिधींचे फोन घेणे टाळले आहे.

## असीम मुनीर अमेरिकेचा सांगावा घेऊन थेट इराणला, पाकिस्तान, इजिप्त, तुर्कीची पुन्हा धडपड : गेल्या २४ तासात कलाटणी देणाऱ्या ५ मोठ्या घडामोडी

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – येत्या पाच दिवसात म्हणजेच २१ एप्रिल रोजी युद्धविराम संपण्यापूर्वी अमेरिका आणि इराण एका कराराच्या जवळ पोहोचले आहेत.



अमेरिकन माध्यमांनुसार, दोन्ही बाजूंमधील चर्चा पुढे सरकली आहे, तरीही काही मतभेद कायम आहेत. दरम्यान, तेहरानमध्ये इराणी अधिकारी आणि पाकिस्तानी लष्करप्रमुख आसिम मुनीर यांच्यात एक महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. अमेरिकेचा संदेश घेऊन मुनीर आधीच इराणमध्ये दाखल झाले असून त्यांनी परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांची भेट घेतली आहे. पाकिस्तान, इजिप्त आणि तुर्की मध्यस्थ म्हणून काम करत आहेत. दरम्यान, अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी व्हान्स, स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर यांच्यासोबत चर्चा करत आहेत आणि मसुदा प्रस्ताव सादर करत आहेत. अधिकाऱ्यांच्या मते, करार घडवून आणण्यासाठी युद्धविराम वाढवला जाऊ शकतो, जरी अमेरिकेने अद्याप औपचारिकपणे सहमती दर्शवलेली नाही.

अमेरिकेच्या नाकेबंदीमुळे इराणवरील दबाव वाढला अमेरिकन अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, होर्मुझच्या सामुद्रधुनीतील ट्रम्प यांची नौदल नाकेबंदी आणि आर्थिक दबावामुळे इराणवर करार करण्यासाठी दबाव वाढत आहे. अमेरिकेने दावा केला आहे की, नाकेबंदी सुरू झाल्यापासून गेल्या ४८ तासांत एकही जहाज इराणी बंदरांवर पोहोचलेले नाही.

## गोरेगावमधील बांगुर नगरजवळील झोपडपट्टीमध्ये भीषण आग

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – मुंबईतील बांगुर नगर गोरेगाव पश्चिम मेट्रो लाईन जवळच्या परिसरात आज आग लागल्याची घटना घडली.



बांगुर नगर परिसरामध्ये डी मार्टच्यासमोर झोपडपट्टीमध्येही आग लागली. घटनेची माहिती मिळतात अग्निशमन दलाचा चार ते पाच गाड्या दाखल होऊन आग विझवण्यासाठी प्रयत्न युद्ध पातळीवर करत आहे.

सुदैवाने या आगीमध्ये अद्याप कोणतेही जीवितहानी झालेली नाही. मात्र या आगीमध्ये चार ते पाच दुकान जळून खाक झाले आहेत. साधारणपणे सकाळी साडेनऊ दहा वाजताच्या दरम्यान ही आग लागली असून आग वाढत गेली. मिळालेल्या माहितीनुसार सजावटीच्या सामानाला डेकोरेशनच्या वस्तूला ही आग लागली.

आग कशामुळे लागली, या संदर्भात पुढील तपास स्थानिक पोलिस आणि अग्निशमन दलाचे जवान करत आहेत.

## त्र्यंबक रोडवरील रिसॉर्टमध्ये रंगायच्या पार्ट्या, आरोपी तिथेच ओढायचे मुलींना जाळ्यात, नाशिक धर्मांतर प्रकरणात सीटच्या हाती महत्त्वाचा धागा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नाशिक** – नाशिकमधील नामांकित आयटी कंपनीतील लैंगिक शोषण आणि धर्मांतर प्रकरणाचा तपास करत असलेल्या विशेष तपास पथकाच्या हाती आता अत्यंत महत्त्वाचे धागेदोरे लागले आहेत.

नाशिक–त्र्यंबकेश्वर रोडवरील 'हॉटेल आनंद रिसॉर्ट' येथे या प्रकरणातील संशयित आरोपी रात्री उशिरापर्यंत पार्ट्या करत असल्याचे समोर आले असून, डखढ ने या हॉटेलची झाडाझडती घेतली आहे. हॉटेलचे रेकॉर्ड आणि रजिस्टर ताब्यात सीटने आनंद रिसॉर्टवर छापा टाकत तिथली महत्त्वाची कागदपत्रे आणि गेस्ट रजिस्टर आपल्या ताब्यात घेतले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, २०२२ ते २०२३ या कालावधीत या ठिकाणी सातत्याने पार्ट्यांचे आयोजन केले जात होते. केवळ पार्टी हॉलच नव्हे, तर हॉटेलमधील रूम्सदेखील मोठ्या प्रमाणावर बुक केल्या जात असल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे. यावरून या प्रकरणाचे गांभीर्य अधिकच वाढले आहे. पार्ट्यांच्या आडून मुलींना 'फूस' तपासात समोर आलेली सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, याच रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या पार्ट्यांमध्ये कंपनीतील हिंदू मुलींना बोल–ावले जात असे. या प्रकरणातील अटक करण्यात आलेले संशयित आरोपी या पार्ट्यांमध्ये मुलींना जाळ्यात ओढण्यासाठी विविध प्रकारची प्रलोभने आणि फूस लावत असत. याच ठिकाणाहून धर्मांतर आणि लैंगिक शोषणाचे षडयंत्र रचले गेल्याचा संशय बळावला आहे.



# ‘स्थायी’च्या सभागृहात २० हजारांची चोरी : ठाकरे सेनेच्या नगरसेविकेचा आरोप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुंबई महापालिकेची सर्वात महत्त्वाची स्थायी समितीच्या सभागृहात २० हजार रुपये चोरीला गेल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेच्या नगरसेविका लक्ष्मी भाटिया यांनी हा आरोप केला आहे. या प्रकरणाची माहिती महापौर रितू तावडे यांना दिल्याचे त्यांनी सांगितले. स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार दुपारी बारा वाजता आयोजित करण्यात आली होती. सभा संपल्यानंतर पार्श्वगायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिली जात असताना, शिवसेना ठाकरे गटाच्या नगरसेविका समिती सदस्या लक्ष्मी भाटिया दाखल झाल्या. उशिराने सभागृहात झालेल्या भाटिया थोडावेळ सभागृहात बसल्यानंतर काही वेळात बैठक संपली. त्यामुळे सर्व सदस्य जेवण करण्यासाठी सभागृहाला लागून असलेल्या दालनात गेले. त्यांच्यासोबत भाटियाही आपली पर्स सभेच्या टेबलावर ठेऊन जेवणासाठी गेल्या.जेवण झाल्यानंतर त्या परत सभागृहात आल्या. यावेळी त्यांच्या पर्सची चेन उघडी असल्याचे दिसले. त्यामुळे त्यांनी पर्समधील वस्तूंची तपासणी केली असता, २० हजार रुपये नसल्याचे दिसून आले.

# महिला आरक्षण सुधारणा विधेयक आज संसदेत सादर होणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महिला आरक्षण कायद्यात सुधारणा करण्यासाठी आज संसदेत तीन विधेयके सादर केली जातील.

या विधेयकांनुसार २०२९ पासून लोकसभा आणि विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाचा प्रस्ताव आहे. यासाठी तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. सुधारणा विधेयकानुसार लोकसभेतील खासदारांची संख्या सध्याच्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे. राज्यांमध्ये ८१५ जागा आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ३५ पर्यंत जागा असतील. जागांची नेमकी संख्या निश्चित करण्यासाठी मतदारसंघांची पुनर्रचनाही केली जाईल. २७३ जागा महिलांसाठी राखीव असतील. या विधेयकांवर १६, १७ आणि १८ एप्रिल रोजी चर्चा होईल. भाजप आणि काँग्रेससह सर्व पक्षांनी आपल्या खासदारांना संसदेत उपस्थित राहण्यासाठी व्हीप जारी केला आहे. ही विधेयके मंजूर करण्यासाठी सरकारला दोन-तृतीयांश बहुमताची आवश्यकता असेल. संसदेने कायद्याला मंजुरी दिल्यानंतर, तो ३१ मार्च २०२९रोजी अंमलात येईल आणि त्याच वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीदरम्यान पहिल्यांदा लागू होईल.

विरोधी पक्ष मतदारसंघ पुनर्रचनेला विरोध करत असून, सभागृहात गदारोळ होण्याची शक्यता आहे. दरम्यान, तामिळनाडूमध्ये मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी विधेयकाच्या प्रती जाळल्या. त्यांचा पक्ष, डीएमके, राज्यभरात आंदोलन करत आहे.

लोकसभेत १८ तास आणि राज्यसभेत १० तास चर्चा कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल हे संविधान (१३१वी दुरुस्ती) विधेयक आणि मतदारसंघ पुनर्रचना (दुरुस्ती) विधेयक सादर करतील, तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक, २०२६सादर करतील. या विधेयकांवरील चर्चेसाठी १८ तासांचा वेळ देण्यात आला आहे. यानंतर राज्यसभेत १० तासांची चर्चा होईल.

### मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनात बैठकीसाठी

# पोलिस पाटील संघाचे मुंबई मंत्रालय येथे महसुल मंत्र्यांना निवेदन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – अमरावती येथे आयोजित करण्यात आलेल्या पोलिस पाटील परिषद २०२६ कार्यक्रमात पालिस पाटील यांच्या प्रलंबित मागण्यां संदर्भात मार्गदर्शनपर आपले विचार व्यक्त करतांना.

महसुलमंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावती येथील पोलिस पाटील संघाचे शिष्ट मंडळास ७ एप्रीलला मंत्रालय मुंबई येथे मुख्यमंत्री यांचेसोबत बैठक आयोजित करण्या संदर्भात पोलिस पाटील परिषदेत मार्गदर्शन करतांना आपले मनोगत व्यक्त केले होते.

त्या अनुषंगाने पोलिस पाटील संघ, अमरावती यांच्या वतीने जिल्ह्यातील प्रातिनिधिक स्वरुपात ९ पालिस पाटील यांचे शिष्टमंडळ मुंबई येथे उपस्थित राहुन महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पोलिस पाटील यांच्या विविध मागण्यांची पुर्तता करणेहेतु मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनात बैठक आयोजीत करण्यात यावी, या करीता राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे, आमदार राजेश वानखडे यांचे उपस्थितीमध्ये भेट घेऊन चर्चा करुन यावेळी मागण्यांचे निवेदन देण्यात आले. `यावेळी मुंबई येथे लवकरच पोलिस पाटील यांचे सेवानिवृत्ती वय वाढ ६० वरुन ६५ या प्रमुख मागणी संदर्भात व ईतर प्रलंबित मागण्यां संदर्भात मुख्यमंत्री यांचेकडे बैठक आयोजित करण्याची विनंती करण्यात आली.

निवेदन देतेवेळी पोलिस पाटील संघ अमरावती शिष्टमंडळ मध्ये किशोर सावंत पाटील, प्रदीप राऊत पाटील, रामेश्वर चौखंडे पाटील, रुपेश उईके पाटील, भाग्येश इंझळकर पाटील, नानकराम कासदेकर पाटील, विभागीय अध्यक्ष शिवानंद पाटील, प्रकाश भारसाकळे पाटील, पोलिस पाटील संघ अध्यक्ष राहुल पाटील सावरकर उपस्थित होते.



**वरुड :** शहरातील पांढुर्णा चौक स्थित वैष्णवी बालरुग्णालय तथा चौधरी मॅटरनिटी अँड सर्जिकल होम येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ.प्रवीण चौधरी तथा प्रसिद्ध स्त्रीरोग प्रसूतीतज्ञ डॉ.समता चौधरी यांचे सह रुग्णालयाचा स्टाफ व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कठोर संघर्षातुन ध्येयसिद्धीकडे वाटचाल करा

### निरोप समारंभात प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी यांचे प्रतिपादन



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – महाविद्यालयातुन मिळालेले ज्ञान, अनुभव व आठवणी विद्यार्थी जीवनाला समृद्ध करतात. जिद्द, आत्मविश्वास व आशावाद जीवनात यशस्वी होण्यासाठी फार महत्त्वाचा असून विद्यार्थ्यांनी कठोर संघर्षातुन ध्येयसिद्धीकडे वाटचाल करावी, असे प्रेरणादायी विचार प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी यांनी मांडले.

ते जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयाच्या आयक्युएसी विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने बी.ए.अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता आयोजित निरोप समारंभा प्रसंगी अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी, प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ.दिनेश खेरडे, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ.लुंबिनी गणवीर तर प्रमुख अतिथी म्हणुन प्रा.सुधीर बानुबाकोडे, डॉ.प्रवीण पवार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.तिलकचंद धोटे, सहायक कार्यक्रमाधिकारी डॉ.प्रशांत चर्जन, आयक्युएसी समन्वयक डॉ.राजेश बोबडे विचारपीठावर उपस्थित होते.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन व हारार्पण करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. मराठी विभाग प्रमुख डॉ.अविनाश धोबे यांनी प्रास्ताविक करुन कार्यक्रमाच्या आयोजनाची भूमिका मांडुन बी.ए.अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभकामना दिल्या.

बी.ए.भाग १ व भाग २ च्या विद्यार्थ्यांनी भेटवस्तु व पुष्पगुच्छ देऊन बी.ए.भाग ३ च्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या प्रसंगी बी.ए.अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आपले अनुभव, आठवणी तसेच महाविद्यालयाप्रती, प्राध्यापकांप्रती असणाऱ्या भावना मनोगतातुन व्यक्त केल्या.

वर्षभर आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांचे पारितोषिक वितरण या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधुन त्यांना उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीने मौलिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन नंदिनी बावने तर आभार सोनाली धुर्वे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्राथमिक शाळा हीच सशक्त राष्ट्रनिर्मितीचे केंद्र आहे

### जि.प.शाळा वघाळच्या बक्षीस वितरणात डॉ.निळकंठ यावलकर यांचे प्रतिपादन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – बालकांमध्ये देशभक्ती, नैतिक मुल्ये आणि शिस्त रुजवुन भविष्यातील सुजाण नागरिक घडविण्यासाठी प्रभावी प्राथमिक शिक्षण महत्वाचे आहे. प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासुनच स्पर्धात्मक परीक्षांची तयारी महत्त्वाची ठरते. राष्ट्रिय मुल्ये रुजविण्यासाठी शिक्षकांचे कार्य मोलाचे ठरते. कारण प्राथमिक शाळा हीच सशक्त राष्ट्र निर्मितीचे प्रमुख केंद्र असल्याचे प्रतिपादन शिक्षण तज्ञ तथा थोर समाजसेवक डॉ.निळकंठ यावलकर यांनी व्यक्त केले.

ते जिल्हा परिषद पुर्व माध्यमिक मराठी व उर्दु शाळा वघाळ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने आयोजित स्पर्धा परीक्षेतील बक्षीस वितरण समारंभात बोलत होते. व्यासपीठावर वरुड नगरपालिकेचे नगराध्यक्ष ईश्वर सलामे, ल्युबा यावलकर, चुडामणी मित्र परिवाराचे कार्यकर्ते तथा समाजसेवक युवा उद्योजक लोकेश अग्रवाल, डॉ.नितीन वानखडे, केंद्रप्रमुख अरविंद वानखडे, उपसरपंच नितीन आंजीकर, उर्दु शाळेचे अध्यक्ष जाहिद अली पटेल, उपाध्यक्ष साजीद अली पठाण आदी मान्यवर उपस्थित होते. सरपंच सागर हरले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमात डॉ.यावलकर बोलतांना पुढे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्राथमिक शिक्षणाबाबत विचार अत्यंत क्रांतीकारी होते. त्यांनी शिक्षण हे सक्तीचे, मोफत आणि सार्वत्रिक असावे यावर भर दिला.

नगराध्यक्ष ईश्वर सलामे यांनी भविष्यातील विज्ञानाच्या वाटा कशा असतील त्याचे फायदे व तोटे याबाबत सांगितले. यावेळी केंद्रप्रमुख अरविंद वानखडे, सरपंच सागर हरले यांची समयोचित भाषणे झाली. माजी नगराध्यक्ष वि.श्रा.यावलकर स्मृती समारोह समिती वरुड तर्फे घेण्यात आलेल्या आंतरशालेय सामान्य ज्ञान स्पर्धेतील प्रथम विजेती वर्ग चवथीची विद्यार्थीनी दुर्गा पोहणे हिला २ हजार रुपयांचे रोख बक्षीस डॉ.निळकंठ यावलकर यांचे हस्ते देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांकाचे १ हजार ५०० रुपयांचे रोख बक्षीस वर्ग पाचवीची विद्यार्थीनी राधा जावळेकर हीला प्रदान करुन नगराध्यक्ष ईश्वर सलामे यांनी तिचा सन्मान केला तर तृतीय क्रमांकाचे १ हजार रुपयांचे रोख बक्षीस वर्ग चवथीची विद्यार्थीनी कृतीका सिलुकर हिला सरपंच सागर हरले यांचे हस्ते देऊन गौरविण्यात आले. यावेळी ‘मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर बोलतोय’ हा एकपात्री प्रयोग करणाऱ्या प्रशिल हरले याने उपस्थितांची वाहवा मिळवली. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भाषणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी सामान्य ज्ञान स्पर्धेतील प्रत्येकी ५०० रुपये रोख प्रोत्साहन बक्षीस नेहा विंचुरकर, माही हरले, जय बनके यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. देवांश बावणे, नव्या कोहळे, प्रिन्स हरले, राधिका सिलुकर, अल्फेज शेख यांना प्रत्येकी २०० रुपयांचे रोख बक्षीस मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले तर हितेश शेंगोळे, ऐहतेशाम पठाण, हर्षल पोहणे, मुकेश भोरे, जिकरा अली, प्रशिल हरले, जान्हवी कोहळे, आराध्या कावनपुरे, जुमेर अली यांना रोख १०० रुपयांचे रोख बक्षीस प्रदान करण्यात आले. ८ हजार रुपयांचे बक्षीस यावेळी विद्यार्थ्यांना वि.श्रा.यावलकर समरोह समिती तर्फे प्रदान करण्यात आले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जि.प.पुर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश विंचुरकर, संचालन शिक्षिका रंजना परतेती तर उपस्थितांचे आभार जेष्ठ शिक्षक देवानंद बागडे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाला साहेबराव जवळेकर, संगीता बावणे, गणेश विंचुरकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उर्दु शाळेचे मुख्याध्यापक अफसर खान, मेघा खोपे, शिक्षिका शहनाज परवीन, शबनम वसीम शहा, ज्योती चांदुरकर, वनीता शिंदे, रेशमा परवीन यांनी परिश्रम घेतले.

# संपादकीय

**{ काम लवकर करावयाचे असेल तर मुहूर्त पाहण्यात वेळ घालवू नका. }**

## मुंबईकरांचा अंत पाहणारी सहनशीलता' : एक शोकांतिका

जगातील आनंदी देशांचा 'हॅपीनेस इंडेक्स' दरवर्षी जाहीर होतो. त्या यादीत फिनलंड, डेन्मार्कसारखे देश अव्वल स्थानी असतात. पण जर कधी जगातील प्रमुख महानगरांमधील लोकांच्या 'सहनशीलतेचा निर्देशांक' मोजला गेला, तर खात्रीने सांगता येते की, मुंबई आणि मुंबईकर यात जगात पहिल्या क्रमांकावर येतील. ही बाब अभिमानास्पद नक्कीच नाही, तर ती एका महानगराच्या विदारक वास्तवाची आणि तिथल्या प्रशासनाच्या अपयशाची तीळ-तीळ तुटणारी गोष्ट आहे. गेली दोन दशके मुंबईकर फक्त आणि फक्त गैरसोयींचा सामना करत आहेत आणि तरीही 'मुंबई कधीच थांबत नाही' या नावाखाली आपल्या कष्टाचे ओझे वाहत आहेत. सहनशीलतेचा अंतहीन प्रवास

मुंबईकरांच्या सहनशीलतेची परीक्षा रोज सकाळी लोकल ट्रेनच्या दरवाज्याला लटकल्यापासून सुरू होते. गेल्या वीस वर्षांत तंत्रज्ञान बदलले, जगाचा चेहरामोहरा बदलला, पण मुंबईच्या लोकल प्रवासातील ती जीवघेणी गर्दी मात्र तशीच आहे. तासनतास प्लॅटफॉर्मवर ताटकळणे, विलंबाने धावणाऱ्या गाड्या आणि रेल्वेच्या रखडलेल्या प्रकल्पांमुळे होणारी कुचंबणा हे आता मुंबईकरांच्या पाचवीलाच पुजले आहे. दररोज लाखो लोक मृत्यूच्या दाढेतून प्रवास करतात, पण एका दिवसाचा पगार कापला जाऊ नये म्हणून दुसऱ्या दिवशी पुन्हा त्याच उत्साहाने (की हतबलतेने) गर्दीत घुसतात. ही सहनशीलता आहे की जगण्याची अटळ सक्ती, हा खरा प्रश्न आहे. पायाभूत सुविधांचा 'चिखल'

गेल्या दोन दशकांपासून मुंबईचा उल्लेख 'प्रगतीपथावर' असलेले शहर असा केला जातो. पण ही प्रगती नक्की कोणासाठी आहे? मुंबईतील रस्त्यांची अवस्था पाहिल्यास असे वाटते की, आपण रस्त्यांवरून चालतोय की खड्ड्यांच्या प्रदर्शनातून? पावसाळा आला की मुंबई तुंबणे ही आता बातमी उरलेली नाही, तर तो एक वार्षिक 'विधी' झाला आहे. मेट्रोची कामे: गेल्या दशकापासून मुंबईभर मेट्रोचे जाळे विणले जात आहे. मेट्रो होणे ही काळाची गरज आहेच, पण त्यासाठी ज्या पद्धतीने शहराचा उकिरडा करण्यात आला आहे, त्याने सामान्य माणसाचे कंबरडे मोडले आहे. धुळीचे लोट, वाहतूक कोंडी आणि अरुंद झालेले रस्ते यामुळे प्रवासाचा वेळ दुप्पट झाला आहे. वाहतूक कोंडी: जो प्रवास १५ मिनिटांत व्हायला हवा, त्यासाठी मुंबईकरांना एक-दीड तास खर्ची घालावा लागतो. इंधनाचा अपव्यय आणि मानसिक तणाव यामुळे मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तरीही, शांतपणे गाडीत बसून राहणे किंवा बसमध्ये उभे राहून धक्के खाणे ही मुंबईकरांची सहनशीलता विस्मयकारक आहे. गृहनिर्माण आणि वाढती महागाई

मुंबईत राहणे हे आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. दहा बाय दहाच्या खोलीत राहून लाखो रुपयांची स्वप्ने पाहणारा मुंबईकर आता हद्दपार होत आहे. प्रचंड भाडे, जागांच्या गगनचुंबी किमती आणि त्या बदल्यात मिळणाऱ्या तुटपुंज्या सुविधा ही एक मोठी क्रूर थट्टा आहे. 'बीडीडी' चाळींचा पुनर्विकास असो किंवा रखडलेले 'एसआरए' प्रकल्प, मुंबईकरांनी प्रत्येक ठिकाणी आश्वासनांची खैरात आणि प्रत्यक्ष कामात दिरंगाईच अनुभवली आहे. 'मुंबई सोनेरी स्वप्ने दाखवते, पण ती स्वप्ने जगण्यासाठी मुंबईकर स्वतःचे रक्त आणि घाम पाणी करतो.' प्रशासकीय उदासीनता आणि 'स्पिरिट ऑफ मुंबई' जेव्हा जेव्हा मुंबईवर संकट आले मग ते अतिवृष्टी असो, रेल्वे अपघात असो किंवा दहशतवादी हल्ला तेव्हा प्रत्येक वेळी 'स्पिरिट ऑफ मुंबई' या शब्दाचा वापर करून मुंबईकरांच्या जखमेवर मीठ चोळले जाते. खरे तर, हे 'स्पिरिट' नसून ती मुंबईकरांची हतबलता आहे. प्रशासन आपली जबाबदारी झटकण्यासाठी या शब्दाचा ढालीसारखा वापर करते. करदात्यांची कुचंबणा: मुंबईकर देशात सर्वाधिक कर भरतात, पण त्या बदल्यात त्यांना शुद्ध हवा, खड्डेमुक्त रस्ते आणि वेळेवर चालणारी वाहतूक व्यवस्था मिळत नाही. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव: सत्तांतरं झाली, नवीन महापालिका आयुक्त आले, पण मुंबईच्या मूलभूत समस्या 'जैसे थे' आहेत. नियोजनाचा अभाव आणि भ्रष्टाचाराचा वाळवीसारखा झालेला प्रसार यामुळे मुंबईची अवस्था 'बड्या घराचा पोकळ वासा' अशी झाली आहे. सहनशीलतेचे रूपांतर हतबलतेत?

कोणीही येऊन मुंबईकरांच्या संयमाची कितीही स्तुती करो, पण हे वास्तव नाकारता येणार नाही की ही सहनशीलता आता टोकाला पोहोचली आहे. गेली दोन दशके मुंबईकरांनी प्रदूषणात श्वास घेतला आहे, कोलाहलात आयुष्य कंठले आहे आणि वेळेच्या अभावी कुटुंबाला दुरावले आहे. ही सहनशीलता आता केवळ जिवंत राहण्यासाठी केलेली धडपड वाटू लागली आहे. जर खरोखरच 'सहनशीलता निर्देशांक' काढला, तर मुंबईकर यात नक्कीच जिंकतील, पण हा विजय पराभवापेक्षाही भयंकर असेल. कारण ज्या शहराचे नागरिक केवळ 'सहन' करायला शिकतात, तिथे प्रश्नांची उत्तरे शोधण्याची प्रवृत्ती मरून जाते.

# श्री संत सेना महाराज ७२६ वी जयंती आणि २०२६ ची वाटचाल

'राजे किती आले गेले! त्यांचे कायदे नष्ट झाले! सत्तेचे दरबार उजाडले! राज्य चाले संतांचे! ग्रामगीता वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी संतांचा महिमा 'संत-चमत्कार' व 'संत-स्वरुप' या ग्रामगीता ग्रंथाच्या अध्यायात प्रगट केला आहे. माऊली संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज यांच्या समकालीन कर्मयोगी संत सेना महाराज यांचा जन्म वैशाख वैद्य व्दादशी ११९० इ.स.१३५७ मध्ये मध्य प्रदेशातील बांधवगड, जि.जबलपुर येथे झाला असला तरी मुळात त्यांचे महाराष्ट्रातीलच परंतु व्यवसायांचे उपजीविकेचे दृष्टीने ते कुटुंब मध्य प्रदेशात गेले आणि तिथेच जन्म झाला. आज त्या जन्म दिनाला ७२६ वर्ष पुर्ण झाली आहेत. मात्र सेवा कार्य संपुर्ण भारतभर विशेषतः भगवान पांडुरंगाच्या कृपा प्राप्तीमुळे मुख्य राहले.

आज ७२६ वी जयंती आणि इ.स.२०२६ सुंदर योगायोग ज्या सेवाभावी नाव्ही समाजात संत जन्माला आले. त्या संत सेना महाराज यांच्या आईचे नाव प्रेम कुंवरबाई व वडिलांचे नाव देविदास आडनाव राहटे तसेच त्या काळातील महान संत ज्ञानेश्वर महाराज यांचे वडील विठ्ठलपंत कुलकर्णी आणि देविदास हे दोघेही रामानंद महाराज यांचे शिष्य त्यामुळे गुरु बंधुचे नाते संत सेना महाराज माऊली ज्ञानेश्वर महाराज व संत नामदेव महाराज यांचे समकालीन एकनिष्ठ भागवत धर्माचे प्रचार प्रसारक होते. संत सेना महाराज यांनी शेकडो अभंग रचना केली असुन त्यांचे अभंग पंजाबी, हिंदी, ब्रज भाषेत, कानडी भाषेत? विवीध संतांचे ग्रंथात समाविष्ट केले आहे तसेच 'गुरुग्रंथ साहेब' या ग्रंथात त्यांच्या अभंगांचा समावेश केला आहे. यावरुन त्यांच्या संत साहित्याची दखल त्याकाळी घेतली. त्यांचा जयंती महोत्सव मध्यप्रदेशातील बांधवगड येथे तसेच महाराष्ट्रातील तिर्थक्षेत्र पंढरपुर येथे तसेच महाराष्ट्रात जीथे जीथे संत सेना महाराज यांचे मंदिर उभारले आहे. त्या ठिकाणी संत सेना महाराज जयंती महोत्सव आजही ७२६ वर्षांपासून हरिपाठ, कीर्तन, प्रवचन, भगवत गीता, रामायण, महाभारत अशा ग्रंथ पारायण तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करुन आजही साजरा केला जातो. श्री संत सेना महाराज यांच्या जीवनावर महाराष्ट्रातील संत साहित्यीक, विचारवंत प्रा.मधुकर जाधव, संतचरित्रकार पुज्य श्री रामकृष्णदादा बेलूरकर, आद्यग्रामगीताचार्य, ह.भ.प.तापकीर महाराज, प्रा.इंद्रजित भालेराव यांनी त्यांच्या जीवन चरित्र व अभंग रचनेचे संशोधन केले असुन संत सेना महाराज यांच्या जीवनावर वारकरी संप्रदायातील जेष्ठ कीर्तनकार ह.भ.प.बाबा महाराज सातारकर, ह.भ.प.रामराव महाराज ठोक, ह.भ.प.श्रीकृष्ण सिरसोलीकर, ह.भ.प.गितांजली झेंडे यांचे सारख्या अनेक कीर्तनकारांनी जनमानसात प्रचार आणि प्रसार केला आहे. माऊली संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रति संत सेना महाराज अनन्य भाव अभंगात व्यक्त करतात. 'ज्ञानदेव गुरु, ज्ञानदेव तारु, उतरतील पैल पारु ज्ञानदेव !धृ! एकदाची गोष्ट सेना महाराज नियमीतपणे रामराया राजे महाराजांच्या दरबारात दैनंदिन मालिश तसेच हजामत करायला जायचे, ऐनवेळी संत सेना महाराज यांच्याकडे पंढरपुर क्षेत्री जाणारे भक्त मंडळी



आल्याने त्यांच्या सेवा कार्यातं गुंतल्याने राजे महाराजांचा सेवेचा वेळ घरीच निघुन गेला. अशावेळी राज्यानी पाठविलेली माणसें सेना महाराज यांना कामावर लवकर पाठवा, असा निरोप पत्नीला देताच ती माणसे राज्याकडे चुकीचा निरोप घेऊन गेली. त्यावर राजा क्रोधात आताचे आता, त्याला घेऊन या, अशावेळी राजे महाराज यांची सेवा खुद्द भगवान पांडुरंगाने करताच, राजाला वेगळाच भास झाला आणि आरशात आणि पाण्याच्या मध्ये भगवंताचे दर्शन घडल्या गेले. सेवेचा मोबदल्यात मोहरा सुध्दा राजाने दान दिल्यात. प्रसंग पुर्ण होतांना काम संपवुन खुद्द सेना महाराज राजाची सेवा करायला आले तर राजा चकित झाला आणि सेना महाराज कडे पाहता पाहता विचारमग्न झाला.

अशावेळी संतांचे विचार आठवतात. 'विटेवरी उभा, पायी ठेवुनीया माथा! जैसा लावण्याचा गाभा! अवघी वारली चिंता, समाधान चिंता, डोळा श्रीमुख पाहता! बहुजन्मी केला लाग, सेना लेख पांडुरंग! एवढी अनन्य भक्ती त्या पंढरीच्या पांडुरंगाच्या प्रती संत सेना महाराज यांची होती, भगवान पांडुरंगाच्या मांदियाळीमध्ये शेकडो संत होवुन गेले. त्यांचे स्थान अढळ आहे. त्यामध्ये संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज, संत सेना महाराज, संत गोरोबा काका, संत सावता महाराज, संत एकनाथ महाराज, संत चोखा महाराज, संत रोहिदास महाराज यांच्या सारख्या असंख्य संतांचे स्थान महत्वपुर्ण आहे. त्या सर्व जुन्या संतांचा विसर पडता कामा नये. आज योगायोगाने संतश्रेष्ठ, संतकवी, संतचरित्रकार श्री संत सेना महाराज यांच्या ७२६ व्या जयंती निमित्त विदर्भातील कॅलिफोर्निया वरुड शहरात तसेच शेंदुरजनाघाट येथे सातपुड्याच्या पायथ्याशी निसर्गाने नटलेल्या ऐतिहासिक गावात गेल्या कीत्येक वर्षांपासुन संत सेना महाराज यांची जयंती संपुर्ण गावांच्या वतीने करण्यात येते. या वर्षाला योगायोग वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ग्रामजंयती अभियान महापर्वात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिनी संत सेना महाराजांची ७२६ वी जयंती या वर्षात आली असुन संपुर्ण महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता पंधरवडा या निमित्ताने सर्व संत महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी एप्रिल महिन्यात करण्यात आला. हा योगायोग श्री संत सेना महाराज संस्थान, वरुड येथे व श्री संत सेना महाराज बहुउद्देशीय संस्था, शेंदुरजनाघाटच्या महिला व पुरुषांच्या वतीने दरवर्षी सेवामुर्ती संत सेना महाराज जयंती महोत्सव साजरा केला जातो. त्यामुळे विदर्भातील जनता जनार्दनाला बांधवगड (मध्यप्रदेश) किंवा पंढरपुर येथे न जाता 'तुझं गावाचं नाही का तिर्थ, अरे रिकामा कशाला फिरत! 'हा संदेश आचरणात आणला तसेच राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रामगीता ग्रंथात 'सेवा सामर्थ्य' या नवव्या अध्यायात संत दामाजी पंत यांचे छायाचित्र देवुन संत सेना महाराजांचा अभंग देवुन त्यांच्या सेवा कार्याचा दाखला दिला आहे. 'करीता परोपकार! त्याच्या पुण्या नाही पार!! करीता परपीडा! त्याच्या पाया नाही जोडा!! आपुले प्यावे समान! दुजा चरफडे देखोन!! आवडे जगा जे काही! तैसे पाहि करावे!! उघडा घात आणि हित! सेना म्हणे निर्श्चित!! या सेवा कार्याला तोड नाही.

अशा सेवकांची प्रत्येक क्षेत्रात आज समाजात गरज आहे. भाषनाने किंवा बोलके ज्ञान सांगितल्याने आपल्या गावाची, खेड्याची किंवा देशांची प्रगती होवु शकत नाही, त्यासाठी स्वतः सेवेसाठी तत्पर व्हावे लागेल. म्हणुनच ग्रामगीता म्हणते. 'जो दुसऱ्यांसि उत्तम करीतो! त्यातची आनंद मानतो! तोची सेवक मी समजतो! येत्या युगाचा..!



**माणिकदास बेलुरकर**
संत साहित्य अभ्यासक
श्री क्षेत्र वरखेड, ता.तिवसा,
जि.अमरावती
मो.९४२००७६५७३

# भारत होतोय उपचार पद्धतींमधील महाशक्ती

येत्या दशकात भारत केवळ 'जेनेरिक' औषधांमध्येच नव्हे, तर नावीन्यपूर्ण औषधे, फर्मेंटेशन आधारित उत्पादने आणि पुढील पिढीच्या उपचार पद्धतींमध्येही एक मोठी शक्ती म्हणून उदयास येण्याच्या स्थितीत भारत आहे.

जागतिक औषधनिर्माण परिदृश्यात जैविक औषधे, बायोसिमिलर्स आणि विशेष औषधांचा वाटा आता औषधनिर्माण महसुलाच्या ४० टक्क्यांहून अधिक आहे. जेनेरिक औषध उत्पादनामधील नेतृत्त्वामुळे दीर्घकाळापासून 'जगाचे औषधालय' म्हणून ओळखला जाणारा भारताचा औषधनिर्माण उद्योग आता व्याप्तीकडून नवोन्मेषाकडे वेगाने वाटचाल करत आहे.




आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मांडलेल्या १० हजार कोटी रुपये खर्चाच्या बायोफार्मा शक्ती या उपक्रमाची घोषणा म्हणजे या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यातूनच येत्या ८ ते १० वर्षांत जैवऔषधनिर्मिती मधील नवोन्मेष आणि जास्त परिणामकारक आणि किफायतशीर औषधोपचारांचे एक प्रमुख जागतिक केंद्र म्हणून उदयाला येण्याचा भारताचा निर्धार स्पष्ट होतो. ही दूरदृष्टी सखोल वैज्ञानिक क्षमता निर्मिती, नवोन्मेष आधारित उद्योगांना चालना आणि पुढील पिढीतील वैद्यकशास्त्रात भारताला एक अग्रणी म्हणून आपले स्थान मजबूत करण्यासाठी आवश्यक दृष्टिकोन प्रदान करेल.

जैविक औषधे आणि बायोसिमिलर्स तसेच प्रगत परिणामकारक आणि किफायतशीर औषधोपचारांना अधिकाधिक चालना देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. हे औषधनिर्माण विभाग, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग आणि जैवतंत्रज्ञान विभागाच्या विद्यमान उपक्रमांना पूरक असून त्यामध्ये जैवऔषधांसह जीवन विज्ञान क्षेत्रातील संशोधन आणि विकासाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सुरु केलेल्या 'फार्मा मेडटेक क्षेत्रातील संशोधन आणि नवोपक्रमाला प्रोत्साहन ', 'संशोधन विकास आणि नवोपक्रम योजना', 'बायोनेस्ट' इत्यादींसारख्या योजनांचा समावेश आहे. एकंदरीत हे सर्व उपक्रम भारताच्या नवोन्मेष परिसंस्थेला बळकट करणे, उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्यातील सहकार्य दृढ करणे आणि जेनेरिक औषधांपासून ते नवोन्मेष आधारित औषध शोध आणि विकासाकडे संक्रमण सक्षम करण्यासाठी तयार करण्यात आले आहेत.

या धोरणातील एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणजे फर्मेंटेशन-आधारित उत्पादन क्षमतांचा विकास करणे हा आहे. अँटीबायोटिक्स, लसी, एन्झाइम्स आणि इतर जैव-औषधे तयार करण्यात हा विभाग खूप महत्त्वाचा असूनही, तो खूप काळापासून आयातीवर अवलंबून आहे. पायाभूत सेवा सुविधांमध्ये गुंतवणूक करुन तंत्रज्ञानाचा विकास आणि हस्तांतरण साध्य करुन आणि उद्देश केंद्रीत प्रोत्साहन प्रदान करुन भारत या महत्त्वपूर्ण क्षेत्रात देशांतर्गत क्षमता विकसित करण्याबरोबरच जागतिक स्पर्धात्मकतेत वृद्धी करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

भारताच्या वैद्यकीय संशोधन परिसंस्थेचा विस्तारही तितकाच महत्त्वाचा आहे. उभारण्यात येणाऱ्या एक हजार मान्यताप्राप्त क्लिनिकल ट्रायल साइट्समुळे जागतिक औषध विकास केंद्र म्हणून भारताची प्रतिमा लक्षणीयरीत्या उंचावेल. किफायतशीर दर आणि कुशल संशोधकांच्या वाढत्या प्रमाणामुळे भारत अत्यंत प्रभावी आणि उच्च दर्जाच्या क्लिनिकल ट्रायलसाठी अगणित संधी प्रदान करणार आहे. त्यासोबतच नियामक चौकटीचे बळकटीकरण आणि संस्थात्मक क्षमतांमधील वृद्धीमुळे भारताला जागतिक मापदंडांशी सुसंगत कामगिरी करणे शक्य होईल, जलदगती मान्यता आणि जागतिक हितधारकांमध्ये विश्वास वाढीला लागेल.

गेल्या काही वर्षांमध्ये भारताने उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन आणि बल्क ड्रग पार्क अशा योजनांच्या मदतीने सक्रिय औषधनिर्माण घटक आणि प्रमुख कच्चा माल यांचे देशांतर्गत उत्पादन जलद गतीने वाढवले आहे. यामुळे देशातील औषधांच्या किंमती कमी झाल्या असून त्या जगातील सर्वात कमी आहेत, त्यामुळेच नागरिकांना आरोग्यसेवा अधिक किफायतशीर दरात प्राप्त होणे शक्य झाले. प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी योजनेमुळे स्वस्त दरात चांगल्या दर्जाच्या जेनरिक औषधांची उपलब्धता वाढली आहे. १९ हजार पेक्षा जास्त जनऔषधी केंद्रांमधून लाखो लोकांना सेवा दिली जाते. कर्करोग आणि दुर्मिळ आजारांवरील औषधांसारख्या महत्त्वपूर्ण उपचारांवरील सीमा शुल्काचे सुसूत्रीकरण यांसारख्या पूरक उपायांमुळे, जीवनरक्षक उपचारांची उपलब्धता आणखी सुधारत आहे. प्रगत उपचारपद्धती जसजशा अधिक व्यापक होत जातील, तसतसे त्या परवडणाऱ्या दरात उपलब्ध होतील आणि सर्वांना समान संधी मिळेल हे सुनिश्चित करणे, हे एक प्रमुख धोरणात्मक प्राधान्य राहील.

जसजसे उद्योगक्षेत्र बदलत आहे, भारत सुस्थापित बाजारपेठेतच नव्हे तर विशेषतः नवोन्मेष आधारित क्षेत्रांमध्येही आपले अस्तित्त्व अधिक ठळकपणे विस्तारण्याच्या प्रयत्नात आहे. सर्व धोरणे या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी आहेत. नियामक सुसूत्रीकरण, मंजुरी प्रक्रियेचे डिजिटलायझेशन आणि जलद मंजुरी या प्रयत्नांमुळे व्यवसाय सुलभता सुधारत आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# आजपासून संसदेचे विस्तारित अधिवेशन

**घटनादुरुस्ती आणि सीमांकनासह महत्त्वाची विधेयके मांडणार**



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – संसदेचे अर्थसंकल्पीय विस्तारित अधिवेशन गुरुवारपासून म्हणजे १६ ते १८ एप्रिल या दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. या काळात केंद्र सरकारतर्फे घटनादुरुस्ती विधेयक आणि सीमांकन विधेयकासह तीन महत्त्वाची विधेयके मांडली जाणार आहेत. संसदेतील महिलांना ३३ टक्के आरक्षण आणि दशकांमधील वाढती लोकसंख्या लक्षात घेता केंद्र सरकार लोकसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेची प्रक्रिया सुरू करणार आहे. या प्रक्रियेनंतर लोकसभेतील जागांची संख्या सध्याच्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. यासाठी केंद्र सरकार नवीन 'सीमांकन आयोग' (डिलिमिटेशन कमिशन) स्थापन करणार असून, २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी ही प्रक्रिया पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. यापूर्वी २००२ मध्ये सीमांकन करण्यात आले होते, मात्र त्यावेळी केवळ मतदारसंघांच्या सीमा बदलण्यात आल्या होत्या आणि जागांची संख्या कायम ठेवण्यात आली होती.

या विधेयकांमुळे नवीन जागा निर्माण करण्याचा आणि विद्यमान मतदारसंघांच्या सीमा निश्चित करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. आगामी जनगणनेला वेळ लागणार असल्याने हे सीमांकन २०११ च्या जनगणनेवर आधारित असेल. ही तीन विधेयके १६ ते १८ एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या विस्तारित काळात संसदेत मांडली जाणार आहेत. वाढत्या लोकसंख्येनुसार राज्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे यासाठी दर काही दशकांनी नवीन जागा निर्माण करणे आणि त्यांच्या सीमा ठरवणे ही एक नियमित प्रक्रिया आहे. आतापर्यंत १९५२, १९६३ आणि १९७३ मध्ये अशा प्रकारे सीमांकन करण्यात आले आहे.

# तमिळनाडू आणि यूपीमधील खासदारांचा फरक ४० वरुन ६१ वर, निवडणूक आणि मतदारसंघ पुनर्रचना आयोग सुद्धा यांच्या खिशात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**तमिळनाडू** – भाजपकडून भारताच्या भविष्याशी आणि संघराज्य पद्धतीशी खेळले जाणारे राजकारण विरोधकांनी कोणत्याही परिस्थितीत हाणून पाडले पाहिजे. सरकार परिसीमन आयोगाच्या अध्यक्षांचा 'पॉकेट व्हिटो' म्हणून वापर करेल. ज्या मतदारसंघांमध्ये भाजप पराभूत झाला आहे, तिथे आपल्या सोयीनुसार सीमा बदलून आणि फेरफार करून राजकीय फायदा मिळवण्याचे त्यांचे षड्यंत्र असल्याचा गंभीर आरोप माजी मंत्री कपिल सिब्बल यांनी केला आहे. सिब्बल यांनी सर्व विरोधी पक्षांना आवाहन केले आहे की, त्यांनी या विधेयकाला संसदेत अजिबात पाठिंबा देऊ नये. संविधानातील १३१ व्या दुरुस्तीसाठी दोन तृतीयांश बहुमताची गरज आहे. राजकीय श्रेय घेणे हा भाजपचा मुख्य हेतू सिब्बल म्हणाले की, भाजप कोणताही निर्णय राजकीय लक्ष्याशिवाय घेत नाही. हे अधिवेशन मुद्दाम १६ ते १८ एप्रिल दरम्यान बोलावण्यात आले आहे, कारण पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिल रोजी निवडणुका आहेत.

# एका अंध जोडप्याची डोळस प्रेमाची दास्तान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – प्रेम आंधळे असते असे नेहमी म्हटले जाते. पण यात बदल करायला हवा.

एका अंध व्यक्तीने प्रेम किती डोळस व सच्चे असू शकते हे दाखवून दिले आहे. १००% दृष्टिहीन असलेल्या राम कृपाल याने आपल्या जोडीदाराच्या सुटकेसाठी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्याची जोडीदारदेखील पूर्णपणे अंध आहे. पण ती मुस्लिम आहे. यामुळे या संबंधांना तिच्या घरच्यांचा विरोध असून तिच्या कुटुंबीयांनी तिला जबरदस्तीने डांबून ठेवल्याचा आरोप रामकृपालने केला आहे. न्यायमूर्ती नवीन चावला आणि न्यायमूर्ती रविंद्र दुडेजा यांच्या खंडपीठाने याप्रकरणी नोटीस बजावली असून, यात महिलेच्या पालकांचाही समावेश आहे. न्यायालयाने निर्देश दिले आहेत की, १८ एप्रिल २०२६ (शनिवार) रोजी त्या महिलेला प्रत्यक्ष न्यायालयात हजर करावे. राम कृपाल याने वकील अनुभव त्यागी आणि पार्थ शर्मा यांच्यामार्फत राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत ही 'हेबियस कॉर्पस' (बंदीप्रत्यक्षीकरण) याचिका दाखल केली आहे. संबंधित महिला सज्ञान असून तिला न्यायालयात सादर करून तिची सुटका करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. रामकृपाल आणि ती महिला दोघेही १००% दृष्टिहीन असून त्यांच्यात संमतीने प्रेमसंबंध होते. ती महिला दिल्लीतील राणी खेडा येथील एका हॉस्टेलमध्ये स्वतंत्रपणे राहत होती.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२८४/२०२६ ने.ता.०८/०५/२०२६**

**अर्जदार :-** १) सुधिर चित्तरंजनसिंह ठाकुर, वय अं.५३ वर्ष, धंदा-शेती, २) ब्रजराज चित्तरंजनसिंह, वय अं.६० वर्ष, धंदा-शेती, क्र.१ व २ रा.सरंडी, पो.सरेखाकला, ता.केवलारी, ३) पुष्पलता नागेंद्रशाह धुर्वे, वय अं.५८ वर्ष, धंदा- घरकाम, रा.ढिलवार, ता.तेंदुखेडा, ४) स्नेहलता चंद्रप्रतापसिंह, वय अं.५५ वर्ष, धंदा- घरकाम, मु.पो.बिर्रा, दिवान, मोहल्ला, ब्रम्हानिडीह, जि.जांजगीर, ५) महेश्वरी भानुप्रतापसिंह, वय अं.५१ वर्ष, धंदा- शिक्षक, रा.वार्ड क्र.५ झेंडाबाजार बडवाराकला बडवारा, जि.कटनी

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मय्यत चित्तरंजनसिंह टक्कनसिंह व मय्यत जनकदेवी चित्तरंजनसिंह, रा.सरंडी, पो.सरेखाकला, ता.केवलारी, जि.सिवनी** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०८/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख ०२/०४/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२८२/२०२६ ने.ता.०७/०५/२०२६**

**अर्जदार :-**

१) रत्ना साहेबरावजी राऊत, वय अं.५९ वर्ष, धंदा-घरकाम

२) रोशन साहेबरावजी राऊत, वय अं.३६ वर्ष, धंदा-शेती

३) सपना संदीपराव गावंडे, वय अं.३८ वर्ष, धंदा-घरकाम

अर्जदार क्र.१ ते ३ रा.वावरुळी, पो.मांगरुळी, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- इगैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत साहेबराव विश्वनाथ राऊत, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०७/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.


आज तारीख **१०/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# विधान परिषदेच्या ९ जागांसाठी पुढील आठवड्यात निवडणूक होणार जाहीर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – विधान परिषदेच्या ९ जागांसाठी पुढील आठवड्यात निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. विधान परिषदेच्या ९ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येणार आहे.

विधानसभेतील संख्याबळानुसार भाजपच्या वाट्याला ५, शिवसेना २, राष्ट्रवादी १ आणि महाविकास आघाडी १ जागा येण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीकडे अतिरिक्त १३ मतं असल्यामुळे महायुतीने आणखी उमेदवार देण्याचे ठरवल्यास निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमी आहे. दरम्यान, विधानसभेतील सध्याचे संख्याबळ पाहता, भाजपचे ५ उमेदवार निवडून येऊ शकतात. मात्र, पक्षाकडे इच्छुकांची यादी खूप मोठी आहे. विशेषतः ज्या नेत्यांना नुकत्याच झालेल्या राज्यसभा निवडणुकीत संधी मिळाली नाही, त्यांनी आता विधान परिषदेसाठी 'फिल्डिंग' लावायला सुरुवात केली आहे. लवकरच निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता असल्याने भाजपसह इतर पक्षातही उमेदवारी मिळवण्यासाठी मोठी चढाओढ सुरू झाल्याचे चित्र आहे. विधान परिषदेतील पुढील ९ आमदारांचा कार्यकाळ संपणार उद्धव ठाकरे (शिवसेना - उबाठा) नीलम गोऱ्हे (शिवसेना) शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी - शरद पवार गट) अमोल मिटकरी (राष्ट्रवादी - अजित पवार गट) गोपीचंद पडळकर (भाजप) रणजितसिंह मोहिते-पाटील (भाजप) राजेश राठोड (काँग्रेस) प्रवीण दटके (भाजप) रमेश कराड (भाजप) दरम्यान, विधान परिषदेचा एक आमदार निवडून येण्यासाठी २८ मतांचा कोटा आवश्यक आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्य**

# धर्मा वानखडे कडून क्षयरुग्णांना फूड बास्केट वाटप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**धारणी** – बौद्ध धर्मात दानपारमी ला अनन्य साधारण महत्व आहे.

दानपारमी ही केवळ देण्याची कृती नसून, अपेक्षारहित, अहंकाररहित आणि पूर्ण श्रद्धेने केलेले दान आहे प्राथमिक आरोग्य केंद्र साद्रावाडी येथे, आरोग्य सहाय्यक या पदावर कार्यरत असणारे धर्मा वानखडे आपले कार्य बजावून ह्युमन राईट्स कॉन्सिल ऑफ इंडिया चे माध्यमातून सामाजिक कार्यात नेहमी तत्पर असतात. तसेच ते आपल्या कलेतून सुद्धा समाज जागृतीचे कार्य करतात.

सामाजिक बांधिलकी जोपासात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून त्यांनी साद्रावाडी गावातील सर्वच क्षयरुग्णांना फूड बास्केटचे वाटप केले.

यावेळी धर्मा वानखडे यांचेसह, गटप्रवर्तिका मंजू खंडेलवाल, आशा सेविका सरला सावलकर उपस्थीत ह्या होत्या.



**वरुड** : कोटा रँकर्स येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीनिमित्त त्यांचे प्रतिमेला हार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी संचालक रमेश कोरडे, मनोहर बेले, मिश्रा, सिंग, कार्यालयीन कर्मचारी भावना जिचकार, नेहा केवटे, प्रितेश उपाध्याय, नलिनी बखाल, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव डोंगर यावलीत साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – शिक्षण महर्षी तथा कृषी रत्न डॉ.पंजाबराव देशमुख सार्वजनिक कृषक वाचनालय डोंगर यावली तालुका मोर्शी जिल्हा अमरावती. येथे विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम बाबासाहेबांचे गुरु महात्मा ज्योतिबा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर डॉक्टर आणि पंजाबराव देशमुख या सुधारणावादी महामानवांच्या प्रतिमेस हार अर्पण करून पूजन करण्यात आले.



कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती प्रा.आनंद तायडे, प्रा.संजय पांडव, रवि नागले यांची लाभली होती. कार्यक्रमाचे अध्यक्षपद ग्रंथालयाचे जेष्ठ संचालक साहेबराव मस्की यांनी भूषविले.

प्रमुख वक्ते म्हणून प्राध्यापक आनंद तायडे सर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि बहुजन विकास याबद्दल सविस्तर माहिती देऊन गावकऱ्यांसोबत संवाद साधला. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले राजश्री शाहू महाराज यांच्या बहुजन समाजाबद्दल संकल्पना स्पष्ट केल्या. देशाची राज्यघटना लिहिताना डॉ.बाबासाहेब आणि डॉक्टर पंजाबराव देशमुख यांच्या भेट आणि कार्या बद्दलची विस्तृत माहिती दिली.

प्रा.संजय पांडव, सदर ग्रंथालयाचे सचिव यांनी डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्यामधील अंबादेवी संस्थान अमरावती सर्वांसाठी खुले करण्यासंदर्भात झालेल्या कामाबद्दलची तसेच घटना लिहिताना आलेला दोघांचा संबंध याबद्दलचा घटनाक्रम सांगितला. सोबतच रवि नागले यांनी बाबासाहेब बद्दल सामाजिक विचार मांडले.

ग्रंथालयाच्या उपाध्यक्ष उज्वला पांडव यांनी महिला आणि बहुजन समाजातील रूढी परंपरा याबद्दल सुवर्ण मध्य काढून बहुजनांनी आपली प्रगती कशी साधावी याबद्दल विवेचन केले.

कार्यक्रमाचे संचालन ग्रंथपाल सुवर्णा राऊत यांनी उपस्थित पाहुण्यांचे आणि इतर उपस्थितांचे आभार मानून प्रसाद देऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

जयंती कार्यक्रमात ग्रंथालयाच्या उपस्थितीमध्ये संचालक आशा गुड्धे तसेच हर्षाली राऊत, इंद्रायणी पांडव, प्रा.रवी मानकर, गौतम झाडे, देविदास नागले, शेखर गांजरे, मुकुंदराव हजारे, राजू राऊत, रमेश ब्राह्मणकर, प्रकाश भामकर, गजानन माकोडे, प्रणव मसाने, किशोर मोहोड, यशस्वी राऊत यांचा सहभाग होता.

# हे नारीशक्ती नव्हे तर भाजपशक्ती विधेयक, संजय राऊतांचा केंद्र सरकारवर घणाघात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महिला आरक्षण लागू करण्यासाठी आजपासून संसदेच्या विशेष अधिवेशनाला सुरुवात होत आहे.

हे अधिवेशन पुढील दोन दिवस चालणार आहे.२०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून महिला आरक्षण लागू करण्याच्या उद्देशाने हे विधेयक मांडण्यात आले असून, त्याचे अधिकृत नाव 'नारी शक्ती वंदन अधिनियम'असे आहे. लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी हे अधिवेशन बोलावण्यात आले आहे.



यासाठी संविधानात दुरुस्ती करण्यात येणार आहे. सध्या लोकसभेत ५४३ खासदार आहेत, मात्र ही संख्या वाढून ८५० पर्यंत जाण्याची शक्यता आहे.

तसेच, महाराष्ट्रातील लोकसभेच्या जागाही ४८ वरून ७२ पर्यंत वाढू शकतात, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. यावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी जोरदार हल्लाबोल केलाय. पाच राज्यात निवडणुका असताना नारीशक्ती विधेयक काढण्याची गरज नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

---

### जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२७९/२०२६ ने.ता.०७/०५/२०२६**

**अर्जदार :-** १) वच्छला लक्ष्मण दहीनकर, वय अं.६७ वर्ष, धंदा-घरकाम, २) विनल लक्ष्मण दहीनकर, वय अं.४१ वर्ष, धंदा-नोकरी, ३) तनुजा तुषार शिंदे, वय अं.४७ वर्ष, धंदा-घरकाम, ४) अर्पिता आत्माराम चव्हाण, वय अं.४४ वर्ष, धंदा-घरकाम, अर्जदार क्र.१ रा.वरुड, ता.वरुड, अर्जदार क्र.२ रा.मुंबई, ता.जि.मुंबई, अर्जदार क्र.३ रा.वसई, ता.वसई, जि.ठाणे, अर्जदार क्र.४ रा.नारासोपारा, ता.वसई, जि.पालघर

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- इगैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत लक्ष्मण भांजी दहेणकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०७/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१०/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

### जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२७६/२०२६ ने.ता.०७/०५/२०२६**

**अर्जदार :-** १) जिजा उत्तमराव घाटोळे, वय अं.६५ वर्ष, धंदा-घरकाम, २) अरुणा दामोधर देशमुख, वय अं.४९ वर्ष, धंदा-घरकाम, ३) दुर्गा साहेबराव टेकोडे, वय अं.४४ वर्ष, धंदा-घरकाम, ४) निलिमा किशोर सोनारे, वय अं.४० वर्ष, धंदा-घरकाम, ५) हर्षा गजेंद्र भड, वय अं.३९ वर्ष, धंदा-घरकाम, ६) भाग्यश्री ज्ञानेश्वर घाटोळे, वय अं.३९ वर्ष, धंदा-घरकाम, ७) अर्णव ज्ञानेश्वर घाटोळे, वय अं.१३ वर्ष, धंदा-शिक्षण, ८) अर्पित ज्ञानेश्वर घाटोळे, वय अं.०९ वर्ष, धंदा-शिक्षण, अर्जदार क्र.१,६ ते ८ रा.वाडेगाव, ता.वरुड, अर्जदार क्र.२ रा.काल्होडी, ता.चांदुर बाजार, अर्जदार क्र.३ रा.करजगाव (गांधीघर), ता.वरुड, अर्जदार क्र.४ रा.सुरळी, अर्जदार क्र.५ रा.गोरेगाव, ता.वरुड

**... विरुध्द ... कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत उत्तमराव आनंदराव घाटोळे व ज्ञानेश्वर उत्तमराव घाटोळे, रा.वाडेगाव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०७/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१०/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

### जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३०६/२०२६ ने.ता.०८/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) मारोती गोविंद नान्हे, वय अं.५६ वर्ष, धंदा-शेती, २) रामदास गोविंदराव नान्हे, वय अं.५४ वर्ष, धंदा-शेती, ३) भानुदास गोविंदराव नान्हे, वय अं.५० वर्ष, धंदा-शेती, ४) मंगेश आनंद नान्हे, वय अं.३४ वर्ष, धंदा-शेती, अर्जदार क्र.१ ते ४ रा.चांदस वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत जयवंताबाई गोविंदराव नान्हे व गोविंद सितराम नान्हे, रा.चांदस वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०८/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१०/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-६४/२०२६ दि.१३/०१/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **मोहम्मद जुबेर खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **बहीन नामे हफसा अलमास मोहम्मद नसीम खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचे जन्म दि.०३/०२/१९८३** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यु चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१३/०१/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

---

# पुण्यात भाजपच्या आजी-माजी नगरसेविकांमध्ये तुफान खडाजंगी, वसतिगृहाच्या कामाच्या टक्केवारीवरुन राडा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – पुण्यातील वसतिगृहाच्या कामावरून भाजपच्या आजी-माजी नगरसेविकांमध्ये तुफान खडाजंगी झाल्याची माहिती समोर आली आहे. दोन गटातील वादाचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर सध्या व्हायरल होतोय. वसतिगृहाच्या कामाच्या टक्केवारीवरून दोघांमध्ये आरोप-प्रत्यारोप केले जात असून पक्षातील हा वाद चव्हाट्यावर आला आहे. बाणेरमधील माजी नगरसेविका राजश्री काळे आणि विद्यमान नगरसेविका रोहिणी चिमटे यांच्यात हा वाद रंगला आहे. कामाच्या टक्केवारीवरून दोघांमध्ये आरोप-प्रत्यारोप महापालिकेतर्फे बाणेर येथे मागासवर्गीय आदिवासी विद्यार्थ्यांसाठी निवासी शिक्षण केंद्र उभारले जात आहे. २०१७ मध्ये काळे या नगरसेविका असताना त्यांनी या केंद्रासाठी प्रयत्न केले होते. मात्र, या कामाची सुरुवात होऊन अनेक वर्ष झाले पण काम पूर्ण झालं नाही. रखडलेल्या कामासाठी तीन कोटी रुपयांची निविदा काढण्यात आलेली आहे. याचा पाठपुरावा करण्यासाठी काळे या भवन रचना विभागात आल्या होत्या. त्यावेळी रोहिणी चिमटे आणि ठेकेदारात चर्चा सुरू असल्याचं त्यांनी बघितलं. या चर्चा एकूण दोघींमध्ये टक्केवारीवरून वाद झाल्याचा आरोप होत आहे. भाजपच्या दोन्ही नगरसेविका यांच्यात झालेल्या वादावादीची चर्चा सध्या शहरभर सुरू आहे. बुलढाणा शहरात शिंदेंच्या शिवसेनेचे आजी- माजी पदाधिकाऱ्यांमध्ये राडा दरम्यान, असाच काहीसा राजकीय वाद बुलढाणा शहरात देखील रंगला आहे. शिंदेंच्या शिवसेनेचे आजी- माजी पदाधिकाऱ्यांमध्ये राडा झाला आहे. जिल्हा संपर्क प्रमुख संजय सोनार यांच्या समोरच हा गोंधळ झाला आहे.

---

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-६०/२०२६ दि.१३/०१/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **मोहम्मद जुबेर खान मोहम्मद नसीम खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे मोहम्मद जुबेर खान मोहम्मद नसीम खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचे जन्म दि.०१/०७/१९८०** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यु चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१३/०१/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

---

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-६३/२०२६ दि.१३/०१/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **मोहम्मद जुबेर खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **बहीण नामे आयेशा अलमास मोहम्मद नसीम खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचे जन्म दि.०१/०३/१९८४** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यु चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१३/०१/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

---

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-९४/२०२६ दि.१५/०४/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **अफरोज खाँ साहेब खाँ, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे अफरोज खाँ साहेब खाँ, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचे जन्म दि.०१/०४/१९७१** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यु चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१५/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

---

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-६८/२०२६ दि.१३/०४/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **वसंत राघोबाजी दंडाळे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे वसंत राघोबाजी दंडाळे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचे जन्म दि.०५/१२/१९६०** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यु चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१३/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**




## ‘तर सरनाईक माझे ड्रायव्हर....’, काशीगाव मेट्रो परिसरातील ३० टक्के जमीनीवर वाद पेटला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मिरा-भाईदर :** – मिरा-भाईदर विधानसभा क्षेत्रातील राजकारणात नव्या वादाची ठिणगी पडली आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे पुत्र पुर्वेश प्रताप सरनाईक यांनी आमदार नरेंद्र मेहता यांना उद्देशून एक पत्र लिहत त्यांनी एका युट्युब चॅनल वर केलेल्या वक्तव्यावर जोरदार टीका केली आहे. या पत्रात पूर्वेश सरनाईक यांनी मेहता यांच्या प्रताप सरनाईक मेरे ड्रायव्हर असते या वक्तव्याचा उल्लेख करत, ते अत्यंत आक्षेपार्ह आणि खालच्या पातळीचे असल्याचे म्हटले आहे. राजकारणात मतभेद असू शकतात, मात्र त्यामध्ये सभ्यता आणि मर्यादा पाळणे आवश्यक असल्याचा स्पष्ट संदेश त्यांनी दिला आहे. पत्रात पुढे नमूद करण्यात आले आहे की, जनतेने दिलेल्या कौलनंतर लोकप्रतिनिधींनी विकासकामांवर लक्ष केंद्रित करणे अपेक्षित असताना, वैयक्तिक टीका करणे योग्य नाही. तसेच चार वेळा निवडून आलेले आमदार आणि सध्याचे मंत्री असलेल्या व्यक्तीबाबत अशा प्रकारची भाषा वापरणे ही राजकीय संस्कृतीला शोभणारी नसल्याचेही त्यांनी अधोरेखित केले आहे.

## तहसिलदाराने सुनावलेला दंड रदद करीत प्रकरण नव्याने सुनावणीसाठी

### उच्च न्यायालयाचा आदेश : वरुडच्या ट्रक चालकाला मोठा दिलासा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – वाळुच्या कथित बेकायदेशीर वाहतुक प्रकरणात अडकलेल्या वरुड येथील ट्रक मालकाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडुन मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाने महसूल विभागाने लावलेला तब्बल ४ लाख ७० हजार ६०० रुपयांचा दंड रद्द करत संपुर्ण प्रकरण नव्याने सुनावणीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे परत पाठवले आहे.




प्रकरणातील याचिकाकर्ता मंगेश उर्फ महेंद्र कठीवाले, रा.वरुड यांच्या मालकीचा एमएच २७ डीटी ७२७ क्रमांकाचा ट्रक २८ एप्रिल २०२५ रोजी वाळुची बेकायदेशीर वाहतुक केल्याच्या आरोपावरुन जप्त करण्यात आला होता. त्यानंतर तहसिलदार, उपविभागीय अधिकारी आणि अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी अनुक्रमे आदेश देत एकुण ४ लाख ७० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. मात्र याचिकाकर्त्याच्या वतीने न्यायालयात असा युक्तिवाद करण्यात आला की, संबंधित ट्रक पोलिस विभागाने जप्त केला असून महाराष्ट्र जमीन महसुल संहितेनुसार अशा प्रकारची जप्ती करण्याचा अधिकार पोलिसांना नाही. त्यामुळे संपुर्ण कारवाईच बेकायदेशीर ठरते. दरम्यान शासनाच्या बाजुने युक्तिवाद करतांना असे सांगण्यात आले की, ट्रक ११ ब्रास वाळु वाहतुक करतांना पकडण्यात आला असून याचिकाकर्त्याने स्वतःच वाहन पोलिस स्टेशनमध्ये ठेवले होते. त्यामुळे पोलिसांनी जप्ती केल्याचा प्रश्नच येत नाही. मात्र न्यायालयाने दोन्ही बाजुंचे युक्तिवाद ऐकुण नोंद घेतली की, पंचनाम्यात वाहन पोलिसांनी जप्त केल्याचा उल्लेख आहे तसेच जप्तीच्या वेळेबाबत विसंगती आढळते. शिवाय, ट्रकची क्षमता ११ ब्रास वाळु वाहुन नेण्या इतकी नसल्याचेही निदर्शनास आले. यासोबतच ई-ट्रांझिट पास वैध असल्याचेही नोंदवण्यात आले. या सर्व महत्त्वाच्या बाबींचा विचार न करता महसुल अधिकाऱ्यांनी दंड लावल्याचे स्पष्ट होत असल्याने न्यायालयाने संबंधित आदेश रद्द व बाजुला ठेवले तसेच संपुर्ण प्रकरण तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे नव्याने सुनावणीसाठी परत पाठवण्याचे आदेश दिले. या शिवाय ट्रक बराच काळ निष्क्रिय असल्याने न्यायालयाने याचिकाकर्त्याला दंडाच्या रकमेची हमी देऊन वाहन तात्पुरते सोडण्याचा दिलासाही दिला आहे. या निर्णयामुळे वाळु वाहतुक प्रकरणांमध्ये प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित अधिकाऱ्यांना आता नव्याने सखोल चौकशी करावी लागणार आहे. संबंधित तहसिलदाराने वाईट प्रवृत्तीच्या लोकांना हाताशी धरुन खोटा पंचनामा, जप्तीनामा व तथ्य बदलविले व त्या खोट्या तथ्याच्या आधारावरती खोटा आदेश पारित केला. त्यांच्या विरोधात याचिकाकर्ता फौजदारी तसेच दिवाणी प्रक्रियेचा वापर करण्याच्या प्रक्रियेत आहे. याचिकाकर्त्याच्या वतीने सिनियर ॲड.एन.एम.नंदाणे आणि ॲड.आर.ए.बागडे यांनी बाजु मांडली.

## ...तर भाडेकरु बनतो सहमालक

### उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – जर एखाद्या भाडेकरूने त्याच मालमत्तेचा किंवा घराचा काही हिस्सा कायदेशीररित्या खरेदी केला असेल तर तो केवळ भाडेकरू राहत नाही.



अशा स्थितीत मूळ घरमालक त्याला भाडेकरू मानून घराबाहेर काढू शकत नाही, असा निर्णय उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला. न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला. एकदा भाडेकरूने मालमत्तेत मालकी हक्क मिळवला की, तो मालमत्तेचा सहमालक बनतो, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.


दक्षिण मुंबईतील जुन्या मालमत्तेशी संबंधित घरमालक आणि भाडेकरू यांच्यातील वाद उच्च न्यायालयात पोहोचला होता. याप्रकरणी न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या एकलपीठापुढे सुनावणी झाली. जुन्या मालमत्तेत एक व्यक्ती अनेक वर्षांपासून भाडेकरू म्हणून राहत होती.

कालांतराने भाडेकरूने मालमत्तेच्या मूळ मालकांपैकी एकाकडून घराचा काही हिस्सा विकत घेतला. यानंतर इतर सहमालकांनी त्या व्यक्तीला भाडेकरू ठरवून निष्कासित करण्यासाठी कायदेशीर लढाई सुरू केली होती. या प्रकरणात तीन भाडेकरूंनी दाखल केलेला न्यायमूर्ती राजेश पाटील यांनी अर्ज मंजूर केला.

## ज्येष्ठ नागरिक, वाहकामध्ये वादावादी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

### एसटीत स्वच्छता अधिभार लागू




**मुंबई** – एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या प्रत्येक प्रवाशांकडून आजपासून दोन रुपये स्वच्छता अधिभार घेण्यात येत आहे. मात्र अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांना सरकारने या आधी तिकीट भाड्यात १०० टक्के सवलत दिली असल्याने ते दोन रुपये अतिरिक्त देण्यास टाळाटाळ करत आहेत. यातून ज्येष्ठ नागरिक व वाहकांमध्ये वादावादी होत आहेत.

एसटीच्या प्रत्येक प्रवाशांकडून आज रात्रीपासून दोन रुपये स्वच्छता अधिभार अतिरिक्त वसूल करण्याचे आदेश प्रशासनाकडून देण्यात आलेले आहे. दररोज अडीच लाख अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवास करीत असून त्यांना दोन रुपये अधिभार लागणार आहे. स्वच्छतेच्या दृष्टीने ही चांगली बाब आहे. त्याला विरोधही नाही. पण ज्येष्ठ अतिरिक्त पैसे देण्यास टाळाटाळ करत करत असल्याने वाद होत आहेत.

मध्यम मार्ग काढावा याला पर्याय म्हणून यूपीआय पेमेंट घेऊन हा प्रश्न सोडवण्यात मदत होते; पण गेले आठवडा सर्व्हर डाऊन असल्याने प्रवाशांच्या खात्यातून पैसे कट होत असून ते एसटीच्या खात्यात जमा होण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे महामंडळाची ही स्वच्छता योजनात काही मध्यम मार्ग काढण्यात यावा, अशी मागणी संघटनेचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली आहे.

## महाराष्ट्रातील पहिलं जनावरांचं ‘ब्युटी पार्लर’

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**सातारा** –महाराष्ट्रासह देशभरातून तब्बल ८२ पुरस्कार मिळवलेली मान्याचीवाडी ग्रामपंचायतःआता पुन्हा एकदा नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे चर्चेत आली आहे, मान्याचीवाडीने महाराष्ट्रातील पहिल्यांदाच जनावरांसाठी ‘ब्युटी पार्लर’ म्हणजेच अत्याधुनिक स्नानगृह सुरू केलं आहेः




नदी-ओढ्यांतील प्रदूषण रोखण्यासाठी उचललेलं हे पाऊल सध्या सर्वत्र कौतुकास्पद ठरतंयःपाहूया यावरचा हा विशेष रिपोर्टः गावाला देशपातळीवर उत्कृष्ट ग्रामपंचायतीचा सन्मानही मिळाला.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील ग्रामीण भागात असलेल्या गावातील मान्याचीवाडी ग्रामपंचायत गेल्या अनेक वर्षांपासून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहेः

आदर्श गाव म्हणून ओळख असलेल्या या गावाला देशपातळीवर उत्कृष्ट ग्रामपंचायतीचा सन्मानही मिळाला आहे. आता या ग्रामपंचायतीने जनावरांसाठी अत्याधुनिक स्नानगृह उभारून एक नवा आदर्श निर्माण केला आहेः

गावातील पाळीव जनावरांमुळे नदी-ओढ्यांमध्ये होणारं प्रदूषण रोखण्यासाठी हा अभिनव प्रयोग राबवण्यात आला आहेः या स्नानगृहात शॉवर, स्वच्छ पाणी, घनकचरा व्यवस्थापन आणि सांडपाण्यावर प्रक्रिया अशा सुविधा उपलब्ध आहेत.

